MHKO050033812021

सौ. आरती प्रभावळकर
//विरुध्द//
श्री. वासु प्रभावळकर वगैरे७.

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ९३/२०२१ मधील**

**निशाणी क्र. ४ खालील आदेश**

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार व वि.प.१ यांचा विवाह डिसेंबर-२०१६ मध्ये झाला. अर्जदार यांनी असे नमुद केले की, लग्नानंतर अर्जदार ही तिचे सासरी नांदायला आली. लग्नानंतर अर्जदार हिचे चारित्र्यावर वि.प. यांनी संशय घेण्यास सुरुवात केली. तसेच वि.प.हे रात्री उशिरा दारु पिऊन येऊन अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण करु लागले. वि.प. यांनी तिला मारहाण करुन हाकलून दिले. त्यावेळी अर्जदारची आई दुबईवरुन आलेनंतर तिने वि.प. यांना समजावून सांगितले असता वि.प. यांनी तिचेकडे ५ लाख रुपयांची मागणी केली. त्यावेळी अर्जदार हिचे आईने त्यांना सन-२०१७ मध्ये ५० हजार रुपये दिले आहेत. त्यानंतर त्यांनी माहेरुन उर्वरित रक्कम आणण्यासाठी तसेच सोने आणण्यासाठी अर्जदार हिचेकडे तगादा लावला. अर्जदार हिला पैसे देणे जमले नाही म्हणून त्यांनी तिला टोचून बोलणे, जेवायला न देणे, घरात कोंडून ठेवणे अशा प्रकारचे त्रास दयायला सुरुवात केली. लग्नानंतर दोन वर्षानंतर अर्जदार गरोदर असताना त्यांनी तिला जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले. तसेच तिचे चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करुन तिला हाकलून दिले. त्यामुळे, सध्या अर्जदार ही तिच्या मावशीकडे राहत आहे. अर्जदार हिने वि.प. यांचेविरुध्द पोलीस स्टेशनला भा.द.वि. कलम ४९८-अ अन्वये केस दाखल केली आहे. वि.प. यांनी तिचे उदरनिर्वाहाकडे दुर्लक्ष केले आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वि.प.१ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ९ येथे दाखल केले व अर्जदार हिचे अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांनी असे नमुद केले की, अर्जदार हिला कधीही तिचे माहेरचेकडून पैसे आणणेसाठी तगादा लावला नाही. अर्जदार गरोदर असताना कधीही

तिला मुल खाली करण्यास सांगितले नाही. अर्जदार हिला घटस्पोटाचे कारणावरुन कधीही शिवीगाळ व मारहाण केली नाही. लग्नानंतर सुरुवातीचे ५ ते ६ महिने अर्जदार ही व्यवस्थीत नांदली. त्यानंतर अर्जदार हीचेवर तिची आई व मावशी या दोघींचा प्रभाव होता. अर्जदार ही मला बाहेरी जाऊन राहायचे आहे, मला ५०,०००/- रुपये दया अशी मागणी करत असे. अर्जदार ही वि.प.१ व त्यांचे घरचे लोकांशी उध्दट बोलणे, घरातील कामे न करणे, स्वयंपाक व्यवस्थीत न करणे, तासनतास मोबाईल घेऊन बसणे अशाप्रकारे वागत असे. अर्जदार ही मला दड्डी गावात राहायचे नाही, मला इचलकरंजी सारख्या शहरात रहायला आवडते, आपण तिकडे जाऊन राहूया असा अट्टाहास धरत होती. ऑगस्ट-२०२० मध्ये अर्जदार हिचे आईने अर्जदार हिला गणेशोत्सवासाठी मावशीकडे इचलकरंजी येथे एक आठवडा पाठवून दया असे सांगून अर्जदार हिस इचलकरंजी येथे घेऊन गेली व तद्नंतर अर्जदार ही आजअखेरपर्यंत वि.प.१ यांचेकडे नांदणेकरीता दड्डी गावी परत आलेली नाही. वि.प. यांनी मध्यस्थामार्फत अर्जदार हिस नांदणेस येणेसाठी प्रयत्न केले, परंतु अर्जदार हिने नांदणेस नकार दिला. तसेच अर्जदार हिने वि.प. हा एकत्र कुटूंबातून विभक्त राहत नसल्याने खोटा अर्ज दाखल केला आहे. वि.प. यांनी अर्जदार हिने विवाहासंबंध पुनस्थापित होणेसाठी एम.सी.नं.८८/२०२० चा दाखल केला आहे. वि.प. हे अर्जदार हिल नांदवण्यास तयार आहेत. वि.प. हे मजुरीचे काम करतात. अर्जदार ही शिवणकाम तसेच ब्युटी पार्लरचा व्यवसाय करुन दरमहा रक्कम रुपये २५ ते ३० हजार इतके उत्पन्न मिळवते. त्यामुळे, सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०४. अर्जदार हिने अर्जात केलेले आरोप हे गंभीर स्वरुपाचे आहेत. अर्जदार हिने सदर अर्जाच्या पुष्ट्यर्थ तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हिने वि.प. हा तिचे चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ व मारहाण करतो तसेच पैशाची मागणी करुन तिला कौटूंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे. तसेच भा.द.वि.कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.रं.नं.४५१/२०२१ ची फिर्याद दाखल केली आहे. यावरुन अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब सिध्द होते.

०५. वि.प.हे मटन विक्रीचे काम करतात. तसेच त्यांना मासीक उत्पन्न रक्कम रु.५०,०००/- इतके मिळते. अर्जदार वगळता त्यांचेवर अन्य कोणीही अवलंबून नाही. याऊलट, अर्जदार ही कोणताही कामधंदा करत नाही. वि.प. यांनी त्यांच्या कामधंदयाबाबत व उत्पन्नाबाबत न्यायालयात पुरावा देणे आवश्यक होते. परंतु, त्यांनी तसा कोणताही पुरावा दाखल केला नाही. अर्जदार ही उदरनिर्वाहासाठी वि.प. यांचेवर अवलंबून आहे व सध्या तिचे मावशीकडे राहत आहे. अर्जदार हिने वि.प. यांची परिस्थीती चांगली असून देखील त्यांनी अर्जदार हिची उदरनिर्वाहाची व्यवस्था केली नाही व तिचेकडे दुर्लक्ष केल्याचे सिध्द केले आहे. त्यामुळे, अंतरिम अर्जातील मागण्या मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**–: आदेश :–**

०१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. वि.प.१ यांनी अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. ६,०००/- (रुपये सहा हजार फक्त) इतकी रक्कम अंतरिम पोटगीसाठी अर्ज दाखल तारखेपासून सदर अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत अदा करावी.

०३. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प यांना विनामुल्य देणेत यावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by AKASH BABURAO REDKAR
Date: 2022.02.15 18:46:16 +0530

दिनांकः १५/०२/२०२२.
इचलकरंजी.

**( अे.बी.रेडकर )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | A. B. Redkar<br>3rd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 15/02/2022 |
| Order signed by P.O. on | 15/02/2022 |
| Order uploaded on | 15/02/2022 |